(३)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ०१०.

क्रमांक : पुविमं/शाखा डीपी/क.म. मान्यता
पुणे - ४११ ०१०.

दिनांक : १४/१०/१९९८

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका/प्राचार्य,

भारतीय जैन संघटनेचे
माध्य. व उच्च माध्य. विद्यालय,
वाघोली, जि- पुणे.

(शास्त्र. कला/
वाणिज्य/विज्ञान)

विषय : कनिष्ठ महाविद्यालयास मान्यता व सांकेतिक क्रमांक देण्याबाबत.....
(नवीन सांकेतिक क्रमांक : जे - ११.२५६ सन १९९८ पासून)

महोदय/महोदया,

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम, १९७७ च्या नियम क्रमांक ६६(१) अन्वये आपण या मंडळाची प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, मार्च १९९९ मध्ये होणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस विद्यार्थी पाठविण्याकरिता आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास शिक्षण खात्याने घातलेल्या अटी व त्याशिवाय खालील अटींवर जे -११.२५६ हा तात्पुरती मान्यता सांकेतिक क्रमांक मराठी/इंग्रजी/उर्दू या माध्यमासाठी सन १९९८-९९साठी देण्यात येत आहे. यापुढे या कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना कनिष्ठ महाविद्यालयाच्या वरील निर्धारित क्रमांकाचा उल्लेख असणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर सांकेतिक क्रमांक छापणे आवश्यक आहे.

१. माध्यमिक शाळा संहितेमधील नियम ३, २ (६,७,८) च्या तरतुदीनुसार सर्व अटी पूर्ण केलेल्या असल्या पाहिजेत.

२. प्रमाणानुसार पुरेशी विद्यार्थी संख्या आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम १९७७ च्या नियम क्रमांक ६७ अन्वये सर्व अटी पूर्ण असल्या पाहिजेत.

३. मंडळाच्या परीक्षेच्या वेळी ज्या केंद्रावर आपल्या शाळेचे विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट होणार असतील, त्या केंद्रावर आवश्यकतेनुसार पुरेसे फर्निचर स्वखर्चाने पोचविण्याची जबाबदारी आपली राहील.

परीक्षा केंद्रावरील बैठक व्यवस्था किंवा फर्निचरसाठी आपले सहकार्य नसल्यास ही मान्यता पूर्वसूचना न देता मंडळ विनियमातील नियम क्रमांक ६९ अन्वये रद्द केली जाईल.

.....२

४. मंडळाच्या परीक्षेसाठी ज्या ज्या वेळेस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवेची आवश्यकता असेल त्या त्या वेळी ती प्राधान्याने दिली पाहिजे. प्रचलित नियमानुसार परीक्षेचे काम हे आवश्यक व सक्तीचे असल्याने आवश्यक सेवकवर्ग उपलब्ध करून दिला पाहिजे. परीक्षेच्या कामासाठी माध्यमिक शाळा सेवाशर्ती नियम १९८१ च्या २२(१) अनुसूची "अ"- (ल), (म) नुसार आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी नकार देणार नाहीत व परीक्षेची सर्व कामे करणे त्यांच्यावर सक्तीचे राहील व त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपल्यावर राहील.

५. मंडळाने वेळोवेळी दिलेल्या विविध सूचना, नियम, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे. तसेच यापुढील काळात मंडळातर्फे ज्या ज्या सूचना दिल्या जातील त्यांचे सातत्याने पालन केले पाहिजे. तसेच ज्या ज्या वेळेस मंडळाला परीक्षा संचालनाच्या कामास आपली मदत लागेल त्या त्या वेळी आपण ती प्राधान्याने दिली पाहिजे.

६. परीक्षा केंद्रासाठी आपल्या शाळेची इमारत ज्यावेळी आवश्यक असेल त्यावेळी ती उपलब्ध करून देणे आपल्यावर बंधनकारक राहील.

७. प्रत्येक वर्षी मंडळ विनियमाच्या नियम क्रमांक ९४(१२) प्रमाणे विहीत मुदतीत म्हणजे १० ऑगस्ट पूर्वी नोंदणी शुल्क (Registration Fee) भरून मंडळास कळवावे. अन्यथा ही मान्यता रद्द केली जाईल.

कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंदणी शुल्काची रक्कम विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ०१० यांचे नावाने डिमांड ड्राफ्टने भरावी.

नोंदणी शुल्क दर :- १. १ ते १०० विद्यार्थी - रू.४००/- प्रमाणे
२. १०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यांमागे - रू. २००/- प्रमाणे

नोंदणी शुल्काची रक्कम भरल्याशिवाय आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत व त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपली राहील, याची नोंद घ्यावी.

कनिष्ठ महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या मंडळाच्या मान्यतेचे नूतनीकरण करण्यासाठी अर्ज दरवर्षी ३० जून पूर्वी या कार्यालयाकडे करण्यात यावा.

*शासन मान्यता पत्र ४१८२ण
पुणे.

(सही)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ४११ ०१०.

प्रत माहितीस्तव :-
१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२. शिक्षण अधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर.

पु/८९०१९